# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

# राहुरी - ४१३ ७२२. जि. अहमदनगर
# (महाराष्ट्र)

## निम्नस्तर कृषि शिक्षण विद्या शाखा

पदविका प्रवेश माहिती पुस्तिका
सन २०२१-२०२२

## कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम
## (२ वर्ष - मराठी माध्यम)
## कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रम
## (३ वर्ष - इंग्रजी माध्यम - सहा सत्र)

ई मेल :adlaempkv२०१२@gmail. com
वेबसाईट : www.mpkv.ac.in
दुरध्वनी क्रमांक : ०२४२६ - २४३२६३

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ
# राहुरी - ४१३ ७२२. जि. अहमदनगर (महाराष्ट्र)

## निम्नस्तर कृषि शिक्षण विद्या शाखा

### विद्यापीठाचे संबंधीत अधिकारी

| अ.नं. | पद | नांव | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण | डॉ. अ.ल.फरांदे | (०२४२६) ४३२०६ |
| २ | कुलसचिव | श्री.प्रमोद लहाळे | (०२४२६) २४३२१६ |
| ३ | सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) | डॉ. श्री. आ. रणपिसे | (०२४२६) ४३२६३ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | श्री. वि.आ. दाभाडे | (०२४२६) ४३२१५ |

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| १. | कृषि तंत्र / कृषि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम |
| २. | कृषि विद्यापीठातील कार्यक्षेत्रातील जिल्हे |
| ३. | पदविका अभ्यासक्रम, कालावधी व पात्रता |
| ४. | महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि तंत्र विद्यालये |
| ५. | ४.१ जिल्हानिहाय घटक / अनुदानीत कृषि तंत्र विद्यालये |
| ६. | ४.२ विद्यापीठ मान्यता प्राप्त विनाअनुदानीत जिल्हानिहाय कृषि तंत्र विद्यालये (प्रथम वर्ष प्रवेश) |
| ७. | ४.३ विद्यापीठ मान्यता प्राप्त विनाअनुदानीत कृषि तंत्र निकेतन (तीन वर्ष कालावधी - इंग्रजी माध्यम - सहा सत्र) |
| ८. | प्रवेश क्षमता |
| ९. | उद्देश |
| १०. | कृषि तंत्र पदविका व कृषि तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रमाबाबतच्या विशेष सुचना |
| ११. | कृषि तंत्र पदविका / कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज भरण्याबाबत उमेदवारांसाठी सूचना |
| १२. | प्रवेश पध्दती |
| १३. | प्रवेश घेण्याबातचे नियम व अटी |
| १४. | प्रवेश रदद केल्यानंतर शुल्क परतावा |
| १५. | विद्यार्थ्यांची वर्तनूक व शिस्त |
| १६. | शिष्यवृत्ती व सवलती |
| १७. | आरक्षित जागा |
| १८. | गुणाधिभार |
| १९. | अभ्याक्रमाचे शुल्क |
| २०. | प्रवेशाकरीता तपासवयाच्या कागदपत्रांची सूचि (Check List) |

## निम्नस्तर कृषि शिक्षण

**१. प्रस्तावना**

१.१ महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणाबरोबर निम्नस्तर कृषि शिक्षण देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. आधुनिक शिक्षणाच्या संकल्पनेनुसार किसान युवक-युवतींनी कृषि व्यवस्थापनाबरोबर दैनंदिन जीवनाला कसे सामोरे जावे हे निम्नस्तर कृषि शिक्षण अभ्यासक्रमामध्ये शिकविले जाते. या शिक्षणामुळे कृषक जीवनातील कर्तव्ये कुशलतेने कशी पार पाडावीत याची जाण होते. कृषि शिक्षणाद्वारे त्यांचा सांस्कृतिक, मानसिक, बौध्दीक, आध्यात्मिक व आर्थिक विकास होऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो. या आत्मविश्वासातून नागरिक आणि गृहजीवन कर्तव्ये, सामाजिक आणि आर्थिक कार्ये तसेच भावी पालक या नात्याने जबाबदा-या कशा पार पाडाव्यात याचे ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जातो. **माती व पाणी परीक्षण** पीक संवर्धन, शेळी-मेंढी पालन, दुग्धोत्पादन, फलोत्पादन, पशुसंवर्धन, कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, रेशीम उत्पादन, कृषि व्यवस्थापन व विपणन, इ. संबंधी प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थ्यांना परिपूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो.

कृषि परीषदेच्या दिनांक १२.०६.२०१९ रोजी झालेल्या ९९ व्या बैठकीतील ठराव. क्रं. ३/९९/२०१९ नुसार कृषि परीषदेने नियुक्त केलेल्या अधिष्ठाता (कृषि), मफुकृवि, राहुरी यांच्या अध्यक्षतेखाली समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेऊन, गुजरात राज्यातील कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमाच्या धर्तीवर कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम (इंग्रजी माध्यम) (तीन वर्ष कालावधी) हा अभ्यासक्रम राज्यातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये सुरु करणेस कृषि परीषद मान्यता प्रदान करते. तदनुषंगाने, पत्र क्रमांक जा.क्रं./मकृप/शिक्षण - १/प्र.क्र.१३२०/१०४९/२०२०, दिनांक १५.०७.२०२० कृषि परीषदेच्या दिनांक ०३.०७.२०२० रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील ठराव क्रमांक ११/१०३/२०२० नुसार महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत सतत 'अ' दर्जा प्राप्त असणा-या एखाद्या संस्थेस सन २०२० -२१ या शैक्षणिक वर्षापासून प्रायोगिक तत्त्वावर गुजरात धर्तीवर तीन वर्ष कालावधीचा पूर्ण इंग्रजी माध्यमाचा कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम सुरु करणेस कृषि परीषदेने मान्यता प्रदान केली आहे.

**१.२** कृषि परीषदेच्या ९८ व्या बैठकीतील ठराव क्रमांक ४ /९८/२०१९ अनुसार राज्यातील चारही कृषि विद्यापीठांतर्गत पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सन २०१९ - २० या शैक्षणिक वर्षापासून संबधित कृषि विद्यापीठस्तरावर करण्यास कृषि परिषदेने मान्यता दिलेली आहे.त्यानुसार विद्यापीठ स्तरावर सदरची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

**२. कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्रातील जिल्हे**

अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर

**३. पदविका अभ्यासक्रम, कालावधी आणि पात्रता**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | पात्रता |
|---|---|---|---|
| १. | कृषि तंत्र पदविका (मराठी माध्यम) | दोन वर्ष | उमेदवार महाराष्ट्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांन्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |
| २. | कृषि तंत्रनिकेतन (सहा सत्र - इंग्रजी माध्यम) | तीन वर्ष | |

## ४.१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहरी अंतर्गत अनुदानीत/संलग्न अनुदानीत घटक कृषि तंत्र विद्यालयांची यादी

| अ. क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे व प्राचार्याचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १. | कृषि तंत्र विद्यालय, जळगांव, ता.जि.जळगांव, प्राचार्य :डॉ.. एम.आर.बेडीस | ६० | (०२५७) २२५२९५० ८७८८०३६४१४ | ktvjalgaon@gmail.com | जळगांव |
| २. | कृषि तंत्र विद्यालय, धुळे,ता.जि. धुळे प्राचार्य :डॉ. आर.जे. देसले | ६० | (०२५६२) २९५२५६ ९४२३१६६१९२ | atsdhule@gmail.com | धुळे |
| ३. | कृषि तंत्र विद्यालय, पुणतांबा, ता.राहाता, जि.अहमदनगर प्राचार्य : डॉ. ए.बी. गायकवाड | ६० | (०२४२३) २७४२२४ ९४२१८८९३६४ | atspuntamba@gmail.com | अहमदनगर |
| ४. | कृषि तंत्र विद्यालय, मांजरीफार्म, ता.हवेली, जि.पुणे प्राचार्य : डॉ. एस.के. कांबळे | ६० | (०२०) २६९९६५५७ ९४२३५७८४९३ | atsmanjarifarm@gmail.com | पुणे |
| ५. | कृषि तंत्र विद्यालय, सोलापूर, ता.जि.सोलापूर प्राचार्य : डॉ. जे.डी. जाधव | ६० | (०२१७) २३७३७०३ ९४२०३५६१५० | atssolapur@yahoo. in | सोलापूर |
| ६. | कृषि तंत्र विद्यालय, बोरगांव, ता.जि.सातारा प्राचार्य : प्रा.एम.एस.शिर्के | ६० | (०२१६२) २६५२२७ ९८५०६१३६४० | patsborgaon@yahoo.com | सातारा |
| ७. | कृषि तंत्र विद्यालय, क.डिग्रज, ता.मिरज, जि.सांगली प्राचार्य : डॉ.बी.टी.पाटील | ६० | (०२३३) २४३७२७९ ९४२०९५१८४० | atskdigraj१@gmail.com | सांगली |
| ८. | शाहू कृषि तंत्र विद्यालय, सैनिक दरबार हॉलच्यासमोर, लाईनबाजार, कसबाबावडा, कोल्हापूर, ता.जि.कोल्हापूर प्राचार्य : डॉ.के.व्ही.गुरव | ६० | (०२३१) २६०१८४६ ९४२३८१६२८९, ९६७३०८३०७२ | psatskolhapur@yahoo. com | कोल्हापूर |
| ९. | कृषि तंत्र विद्यालय, मालेगांव, ता.मालेगांव जि.नाशिक प्राचार्य : प्रा.एच.के.जाधव | ६० | (०२५५४) २५६४५९, ७७२००२०७५२ | atsmalegaon१९५५@gmail.com | नाशिक |

## ४.२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहरी अंतर्गत विनाअनुदानीत कृषि तंत्र विद्यालयांची यादी

अहमदनगर

| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १. | कृषि तंत्र विद्यालय, भेंडा, ता.नेवासा जि.अहमदनगर<br>प्राचार्य : श्री. मते सोपान लक्ष्मण | ६० | ०२४२७ -२५५१६६,<br>९६३७९६६१४१,९६३७९६६११७ | atsbhenda1995 @gmail.com | अहमदनगर |
| २. | कृषि तंत्र विद्यालय, मालदाड, ता. संगमनेर, जि.अहमदनगर<br>प्राचार्य : श्री. बाचकर. जी.बी. | ६० | ९०७५५५९१९९,८०१०२४१४२४ | shramshaktipoly @gmail.com | अहमदनगर |
| ३. | कृषि तंत्र विद्यालय, लोणी, ता.राहाता, जि.अहमदनगर<br>प्राचार्य : प्रा. एस.बी. जोंधळे | ६० | ०२४२२ -२७३६८४<br>८७६६८८०९६६ | iads @pravara.in | अहमदनगर |
| ४. | कृषि तंत्र विद्यालय, आदिनाथनगर, ता.पाथर्डी जि.अहमदनगर<br>प्राचार्य : डॉ.युवराज बबन सुर्यवंशी | ६० | ०२४२८ -२४५४४५<br>९४२०६३७३१२,९४२२२८१०१० | atsadinathnagar @gmail.com | अहमदनगर |
| ५. | कृषि तंत्र विद्यालय, सुपा, ता.पारनेर, जि.अहमदनगर<br>प्राचार्य:श्री.बाळासाहेब सोनाजी देशमुख | ६० | ९८९०५०८४९९, ८६०५१९२२८५ | pathare.aniket @gmail.com | अहमदनगर |
| ६. | कृषि तंत्र विद्यालय, डोळासणे,ता.संगमनेर, जि.अहमदनगर,<br>प्राचार्य : श्री.कुदळ.जी.बी. | ६० | ७५८८०९४६४० | ktndolasane @gmail.com | अहमदनगर |
| ७. | कृषि तंत्र विद्यालय, सिध्दटेकबेरडी,ता.कर्जत,जि.अहमदनगर<br>प्राचार्य : श्री. बनसोडे.सी.के. | ६० | ८६००६८६७७५,९९२१४७५५५५ | sdskgvp @gmail.com<br>siddhivinayakagri2004 @gmail.com | अहमदनगर |
| ८. | कृषि तंत्र विद्यालय, घारगांव, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर<br>प्राचार्य : श्री. माने.व्ही.ए. | ६०च | ०२४८७ -२७२५२६<br>९०२१९७७८१६,९९२१४७५५५५ | sdskgvp @gmail.com<br>bhujbalashok9@gmail.com | अहमदनगर |
| ९. | कृषि तंत्र विद्यालय, मिरजगाव, ता.कर्जत जि.अहमदनगर<br>प्राचार्य : श्रीम. शिंदे.एस.ए. | ६० | ९७३०६५५०२४,९६८९९५५६६७ | apsmirajgaon @gmail.com | अहमदनगर |
| १०. | कृषि तंत्र विद्यालय, टाकळीढोकेश्वर, ता.पारनेर जि.अहमदनगर<br>प्राचार्य : श्री.रविंद्र भाऊ पानसरे | ६० | ९५५२५२२१६९ | sampadaagripoly @gmail.com | अहमदनगर |
| ११. | कृषि तंत्र विद्यालय, वाळुंज, ता, जि.अहमदनगर<br>प्राचार्य : श्रीमती. तोडमल.व्ही.वाय | ६० | ०२४१ -२६७५२५४<br>८७६६५८४११८ | apswalunj @gmail.com | अहमदनगर |

पुणे

| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे व प्राचार्याचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १२. | कृषि तंत्र विद्यालय, मांडवगणफराटा,ता.शिरुर, जि.पुणे<br>प्राचार्य : श्री. बी. ए. कुंभार | ६० | ९७६५८१५३१९ | bharatkumbhar10 @gmail.com | पुणे |
| १३. | कृषि तंत्र विद्यालय, चिंचोलीमोराची, ता.शिरुर, जि.पुणे<br>प्राचार्य : श्री. चव्हाण.जी.एस | ६० | ९०११२९६५०० | jaymalhar1111@rediffmail.com | पुणे |
| १४. | कृषि तंत्र विद्यालय, बावडा,ता.इंदापूर, जि.पुणे<br>प्राचार्य : श्री. व्ही.के.मोहिते | ६० | ९८६०४३५०९१ | agripolytech.bawada@gmail.com | पुणे |

सांगली

| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे व प्राचार्याचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १५. | कृषि तंत्र विद्यालय, आष्टा, ता.वाळवा, जि.सांगली<br>प्राचार्य : श्री.धनाजी भानुदास पाटील | ६० | ९९७५१३९०९० | agriculturepolytechnicashta@yahoo.com, pdhanaji814@gmail.com | सांगली |
| १६. | कृषि तंत्र विद्यालय, आटपाडी,ता.आटपाडी, जि.सांगली<br>प्राचार्य : श्री. विशाल भागवत यादव | ६० | ९७६६०८११००,९७६७०३७६९१ | manganga.krishi@gmail.com | सांगली |
| १७. | कृषि तंत्र विद्यालय, करंगळीआरळा, जि.सांगली<br>प्राचार्य : श्री. विकास भाऊसाहेब जंगम | ६० | ७८४१८५२४०९ | Vikasjangam8955@gmail.com | सांगली |
| १८. | कृषि तंत्र विद्यालय, उमदी,ता.जत, जि.सांगली<br>प्राचार्य : श्री. रोहीत राजेंद्र माने | ६० | ९९६०२००१०९ | ujwalumadi@gmail.com | सांगली |

सातारा

| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे व प्राचार्याचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १९. | कृषि तंत्र विद्यालय, फलटण, ता.फलटण, जि.सातारा<br>प्राचार्य : श्री. जालिंदर सोपान माने | ६० | ९८८१२६५९७२ | psiaphn@gmail.com | सातारा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २०. | कृषि तंत्र विद्यालय, खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा<br>प्राचार्य : श्री. धरमेंद्र हिरामण माने | ६० | ९८५०११८७२८ | rdkapkhandala@gmail.com | सातारा |
| २१. | कृषि तंत्र विद्यालय, राममळा.ता.पाटण, जि.सातारा<br>प्राचार्य : डॉ. बडवे गिरीश निलकंठ | ६० | ८८८८९०९३९८ | krishitantrarammala@gmail.com,<br>shramjivi@gmail.com | सातारा |
| २२. | कृषि तंत्र विद्यालय, रहिमतपूर, ता.कोरेगाव, जि. सातारा<br>प्राचार्य : श्री. संभाजी साहेबराव शेरकर | ६० | ९८९०९१२६२८ | sdmaps@rediffmail. com | सातारा |

कोल्हापूर

| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे व प्राचार्याचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| २३. | कृषि तंत्र विद्यालय, परिते<br>प्राचार्य : कु. कोमल सुभाष पाटील | ६० | ७३५०१०३२२५ | prinagripolytechparite@gmail.com | कोल्हापूर |
| २४. | कृषि तंत्र विद्यालय, कागल<br>प्राचार्य : डॉ. बी. एन. पाटील | ६० | ०२३१-२४४६३३<br>९३७३२८१३०१ | principalapkagal@gmail.com | कोल्हापूर |
| २५. | कृषि तंत्र विद्यालय, गारगोटी<br>प्राचार्य : सौ.प्रणिता प्रणील देसाई | ६० | ७३५०५७३४६४ | krushitngrt@gmail.com | कोल्हापूर |
| २६. | श्री.बाबगोंडा देवगोंडा पाटील कृषि तंत्र विद्यालय, दत्तवाड/ घोसरवाड प्राचार्य : सुमंत ज्ञानोबा लाड | ६० | ९६६५२२०२२७,९५१८९१६२५५ | agripolytech123@gmail.com | कोल्हापूर |
| २७. | कृषि तंत्र विद्यालय, तारळे<br>प्राचार्य : कु. स्वाती बाळासाहेब मोरे | ६० | ८८३०२७६८७४ | krushipolytarale2016@gmail.com | कोल्हापूर |
| २८. | कृषि तंत्र विद्यालय, तळसंदे<br>प्राचार्य : श्री. प्रल्हाद शिवाजी पाटील | ६० | ९४२००५३३९७ | dypaptalsande@gmail.com | कोल्हापूर |
| २९. | कृषि तंत्र विद्यालय, कणेरी मठ, ता. करवीर,जि. कोल्हापूर<br>प्राचार्य : कु. तांबे.एम.डी | ६० | ९६०७०७९५४९, ९३५९२४८६३९ | ssatskaneri@gmail.com | कोल्हापूर |

नाशिक

| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| ३०. | कृषि तंत्र विद्यालय, चिंचवड, ता.त्र्यंबकेश्वर<br>प्राचार्य :श्री . देशमूख.आर.के. | ६० | ७०६६६०४०४२<br>९५९५७९८७४४ | agrichinchwad@gmail.com | नाशिक |
| ३१. | कृषि तंत्र विद्यालय,दरेगांव, ता.मालेगांव<br>प्राचार्य :श्री. एस. डी. जाधव | ६० | ९८६००२६०३१,९१७५०९२१२३,<br>७३५०४८६९२७ | ppkmktvdaregaon@yahoo.in | नाशिक |
| ३२. | कृषि तंत्र विद्यालय, चंदनपुरी, ता.मालेगांव<br>प्राचार्य : श्री वायडे.जे.एस. | ६० | ९४०३१५९२८१<br>९४२२२६८९०४ | atschandanpuri@gmail.com | नाशिक |
| ३३. | कृषि तंत्र विद्यालय,येवला, ता. येवला<br>प्राचार्य : श्री. गायकवाड.बी.व्ही. | ६० | ८२७५३२४११३<br>९४२२७२४११३ | agripolitech२०००@gmail.com | नाशिक |
| ३४. | कृषि तंत्र विद्यालय,बाभुळगांव,ता.येवला<br>प्राचार्य : श्री. बाजड.अे.आर. | ६० | ९४०४५०२८७८ | ktvbabhulgaon@gmail.com | नाशिक |
| ३५. | कृषि तंत्र विद्यालय,मानूर, ता.कळवण<br>प्राचार्य : श्री. बच्छाव सचिन दादाजी | ६० | ८२७५५८६२२९,९५९५५०९७९७ | kbhagritechmanur@gmail.com | नाशिक |
| ३६. | कृषि तंत्र विद्यालय,नाशिक<br>प्राचार्य : श्री.कमलेश पांडुरंग भोये | ६० | ०२५३-२३११०९८<br>९९६०८२६६१७ | agi.polytechnicnashik@gmail.com | नाशिक |
| ३७. * | कृषि तंत्र विद्यालय,सौंदाणे, ता.मालेगाव<br>प्राचार्य : श्री. तुरेवाले ज्ञानेश्वर पोपटराव | ५३* | ९९७५३६०१२३,९५९५४९००९९ | ssktnsaundane२०००@gmail.com | नाशिक |
| ३८. | कृषि तंत्र विद्यालय,बोलठाण, ता.नांदगांव<br>प्राचार्य : डॉ. बहुरे जी.के. | ६० | ७५०७२५७७६२ | ckpagripolytech९९@gmail.com | नाशिक |

जळगाव

| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| ३९. | कृषि तंत्र विद्यालय, अमळनेर ता.अमळनेर , जि.जळगाव<br>प्राचार्य : श्री. जी.जे. पवार | ६० | ०२५६२-२६०२३५<br>८३२९१४९५१२ | navalbhaukrushiv@gmail.com | जळगाव |
| ४०. | कृषि तंत्र विदयालय, अडावद, ता.चोपडा, जि.जळगाव<br>प्राचार्य : श्री. माळी. ए.के. | ६० | ९४२०२२८०६५<br>९५८८६६३७३० | agripolyadawad@rediff.mail.com | जळगाव |

| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| ४१. | कृषि तंत्र विदयालय, चांदसर ता.धरणगाव जि.जळगाव<br>श्प्राचार्य : श्री. बी.एस.मुराळकर | ६० | ९५२७५६३२९४<br>७२४९८२९९७१ | agriktnc@gmail.com | जळगाव |
| ४२. | कृषि तंत्र विदयालय, चोपडा, ता.चोपडा, जि. जळगांव<br>प्राचार्य : श्री.बी.जी. पाटील | ६० | ०२५८६-२२३६९३<br>८८८८३२९८७२ | agripolychopda@gmail.com | जळगाव |
| ४३. | कृषि तंत्र विदयालय, डिकसाई , ता.जि.जळगाव<br>प्राचार्य : श्री. संदीप.जी.पाटील | ६० | ८२७५५१०२५०<br>९९६०७६०४७९ | ktvdiksai@gmail.com | जळगाव |
| ४४. | कृषि तंत्र विदयालय, किनगाव ता.यावल, जि.जळगाव<br>प्राचार्य : श्री. डी.एस.बारी | ६० | ९७३०२९२९६१ | ktnkingaon@gmail.com | जळगाव |
| ४५. | कृषि तंत्र विदयालय, निंभोरा ब्रु. ता. रावेर, जि.जळगाव<br>प्राचार्य : श्री. एम.टी.बोंडे | ६० | ०२५८४-२८००४४<br>९९२३७९१०७५,८५५२९८७०७७ | atsnimbhora@gmail.com | जळगाव |
| ४६. | कृषि तंत्र विदयालय, मुक्ताईनगर,ता. मुक्ताईनगर, जि.जळगाव<br>प्राचार्य : श्री. पी.एस.घटे | ६० | ०२५८३-२३४८०७<br>८२०८३५९२३३ | a.p.muktainagar@gmail.com | जळगाव |
| ४७. | कृषि तंत्र विदयालय, पिलखोड, ता.चाळीसगाव,जि.जळगाव<br>प्राचार्य : श्री.आर.एस.महाजन | ६० | ९४५०६४१५५१<br>९८५०६४१५५१ | ktnpilkhod@gmail.com | जळगाव |
| ४८. | स्व.आर.एस.बाफना कृषि तंत्र विदयालय, कोल्हे, ता.पाचोरा, जि.जळगाव<br>प्राचार्य : श्री. एम.पी. पाटील | ६० | ०२५९६-२१९९९०<br>९३५९८०१०३१ | agribafna२६@gmail.com | जळगाव |
| ४९. | कृषि तंत्र विदयालय, पाल, ता.रावेर, जि.जळगाव<br>प्राचार्य : श्री. सी.एम. पाटील | ६० | ०२५८४-२८८४२४<br>९८६०६६९१९८,९४०५८८०९०६ | ktnpal२०१४@gmail.com | जळगाव |
| ५०. | कृषि तंत्र विदयालय, वाकोद, ता.जामनेर,जि.जळगाव<br>प्राचार्य : प्रा. डी.आर. चौधरी | ६० | ८३०८०३५९८९, ९४२१५१४७४३ | gktnwakod@gmail.com | जळगाव |
| ५१. | गौराई कृषि तंत्र विदयालय, वाकोद, ता.जामनेर,जि.जळगाव<br>प्राचार्य : प्रा.पी.व्ही.सावळे | ६० | ८४५९५९७९४५<br>९४२१५१४७४३ | gktnwakod@gmail.com | जळगाव |

सोलापूर

| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे व प्राचार्याचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| ५२. | कृषि तंत्र विद्यालय, गौडगांव, ता.बार्शी जि.सोलापूर<br>प्राचार्य : श्री. सोणवणे.के.पी. | ६० | ७५८८७९७४३४ | Kuldipsonawane०३६@gmail.com | सोलापूर |
| ५३. | कृषि तंत्र विद्यालय, अकलुज, ता.माळशिरस जि.सोलापूर<br>प्राचार्य : श्री. सणस.एम.टी | ६० | ९६३७८९८९४८ | agri.tech@rediffmail.com | सोलापूर |
| ५४. | कृषि तंत्र विद्यालय, अनगर, ता.मोहोळ जि.सोलापूर<br>प्राचार्य : श्री. करंडे.पी.पी | ६० | ९७६३२१७४८९ | anagarkrishi२००१@gmail.com | सोलापूर |
| ५५. | कृषि तंत्र विद्यालय, बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर<br>प्राचार्य : श्री. गलांडे.पी.आर | ६० | ९४०५५४८७२७ | kktn२१३०barshi@gmail.com | सोलापूर |
| ५६. | कृषि तंत्र विद्यालय,वडाळा, ता.उ.सोलापूर जि.सोलापूर<br>प्राचार्य : श्री. शेनमारे.पी.बी | ६० | ९८२३३३७२२७ | lapwadala२०१२@gmail.com | सोलापूर |
| ५७. | कृषि तंत्र विद्यालय, बोराळे, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर<br>प्राचार्यः श्री. कांबळे. एस.डी. | ६० | ९९७५७९९९२१ | rejeshkamble७७०@gmail.com | सोलापूर |
| ५८. | कृषि तंत्र विद्यालय, कडलास, ता.सांगोला , जि. सोलापूर<br>प्राचार्य : श्री. के.एम.दिघे | ६० | ९५६१४३६९७९ | Vilaslokhande७२@gmail.com | सोलापूर |
| ५९. | कृषि तंत्र विद्यालय, एकतपुर, ता.सांगोला जि.सोलापूर<br>प्राचार्य : श्रीमती. के.जी. वाघमारे | ६० | ९७६६८२७२४९ | rschandne@gmail.com<br>krushiekhatpur@gmail.com | सोलापूर |

धुळे जिल्हा

| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे व प्राचार्याचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| ६०. | कृषि तंत्र विद्यालय, बोराडी, ता.शिरपूर, जि.धुळे<br>प्राचार्य : श्री. एम.के.माहेश्वरी | ६० | ९६२३२९८९४३,९७३०६०४४८४ | mahaheshwarimk@rediffmail.com | धुळे |
| ६१. | कृषि तंत्र विद्यालय, साक्री, ता.साक्री, जि.धुळे<br>प्राचार्य : प्रा.डी.आर.बिरारीस | ६० | ७६२०८५०१२६ | krushitantrasakri२०००@gmail.com | धुळे |

| अ.क्र. | कृषि तंत्र विद्यालयाचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| ६२. | कृषि तंत्र विद्यालय, मेहरगांव, ता. जि.धुळे<br>प्राचार्य:सौ. सरला नामदेव पवार | ६० | ९४२०८१३०८३,९१७२७३५८४६ | krishividyalaymehergaon@gmail.com | धुळे |
| ६३. | कृषि तंत्र विद्यालय, मंदाणे, ता.शहादा, जि.नंदुरबार<br>प्राचार्य : श्री. सुरेश लक्ष्मण वाघ | ६० | ०२५६५-२६२५००<br>९४०४५७७८५७,९३७०६४३८६४ | waghsuresh७८@yahoo.in | नंदुरबार |
| ६४. | कृषि तंत्र विद्यालय, रांझणी, ता.तळोदा, जि.नंदुरबार<br>प्राचार्य : श्री. प्रविण जयवंत वसावे | ६० | ९४२३९४३३९१,९४०५८१९०२० | jainpravin०२२@gmail.com | नंदुरबार |
| ६५. | कृषि तंत्र विद्यालय, उमर्दे, ता. जि. नंदुरबार<br>प्राचार्य : श्री. कृष्णा गंगाराम मराठे | ६० | ९४२३५६४९५६, ८७८८२६३२३५ | ktniketanumarde@rediffmail.com | नंदुरबार |

**४.३ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहरी अंतर्गत विनाअनुदानीत कृषि तंत्र निकेतन**

| अ.क्रं | कृषि तंत्र निकेतनाचे नांव | एकूण प्रवेश क्षमता | दुरध्वनी क्रमांक | ई - मेल | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट पदमश्री आप्पासाहेब पवार कृषि तंत्र निकेतन, बारामती, ता. बारामती, जि. पुणे प्राचार्य : श्री. ए.बी. रासकर * | ४० तथापि, (१५ % जागा (०६) व्यवस्थापन कोटयासाठी आहेत.) | ०२११२ - २५५५१८, २५५६१८, ९९२१५८७१४३ | agripolybaramati@rediffmail.com | पुणे |

*** अशी खुन केलेल्या विनाअनुदानीत कृषि तंत्र विद्यालये / निकेतनांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे व शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन कोटा लागू आहे. तथापि, सदरहू व्यवस्थापन कोटयासाठी ठरविण्यात आलेल्या जागा एकूण प्रवेश क्षमतेच्या जागेतून वजा करुन उर्वरीत जागांसाठी गुणानुक्रमे व शासन निर्णयाप्रमाणे वेळोवेळी ठरविलेल्या आरक्षीत धोरणानुसार भरल्या जातील.**

**५. प्रवेश क्षमता :**

प्रत्येक कृषि तंत्र विद्यालयाची विद्यार्थी प्रवेश क्षमता ६० इतकी आहे.

कृषि तंत्रनिकेतनची विद्यार्थी प्रवेश क्षमता ४० इतकी आहे.

**६. कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम उद्देश**

- शेतकरी व शेत मजुरांच्या मुलांना व तत्सम विषयांचे प्रात्यक्षिकाभिमूख शिक्षण देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे त्यामुळे स्वत:ची शेती करण्यास प्रवृत्त होऊन सुधारीत तंत्रज्ञानाचा वापरामुळे कृषि उत्पादन वाढेल.
- कृषि तंत्र पदविकाधारकांस कृषिपूरक स्वयंरोजगाराभिमूख उद्योगाव्दारे स्वत:च्या रोजगाराची निर्मिती होऊन स्वावलंबी होता येईल व त्याव्दारे इतरांना देखील रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.
- कृषि **पदविकाधारक** इतर शेतक-यांना मार्गदर्शक म्हणून कार्य करतील.
- कृषि **पदविकाधारकास** कृषि सहाय्यक म्हणून शासकीय अथवा खाजगी क्षेत्रात सेवा करता येईल.

**६.१ कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रम उद्देश**

- **कृषि तंत्र निकेतन पदविका धारकास बीएस्सी कृषि या पदवीच्या व्दितीय वर्षात एकूण प्रवेश क्षमतेच्या दहा टक्के जागांवर गुणानुक्रमे प्रवेश दिला जाईल.**

**७. कृषि तंत्र पदविका व कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रमाबाबतच्या विशेष सूचना :**

**७.१** उमेदवार **हा महाराष्ट्रातील** विभागातील रहिवाशी असावा. विद्यार्थ्यांना प्रवेश रहिवाशी जिल्हानिहाय दिला जाईल.

**८. कृषि तंत्र पदविका /कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज भरण्याबाबत उमेदवारांसाठी सुचना :**

८.१ प्रवेश देण्याबाबतचे प्रगटण जाहीर झाल्यापासून विद्यापीठाच्या संकेतस्थळ www.mpkv.ac.in वर दिनांक २३.०८.२०२१ पासून प्रवेश माहितीपुस्तिका व प्रवेश अर्जाचा नमूना उपलब्ध करून देण्यात येईल. प्रवेश पात्र उमेदवाराने सदरील संकेतस्थळावरुन प्रवेश माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज डाऊनलोड करून प्रिंट काढावी. कृषि तंत्र पदविका (मराठी माध्यम - दोन वर्ष कालावधी) व कृषि तंत्रनिकेतन (इंग्रजी माध्यम - तीन वर्ष कालावधी) प्रवेशासाठी वेगवेगळा अर्ज करावा लागेल.

८.२ प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज काळजीपूर्वक वाचावा. प्रवेश अर्जातील तपशिल पूर्ण सत्य व अचूक भरावा. उमेदवाराने स्वतःच्या हस्ताक्षरात प्रवेश अर्ज भराव व सर्व संबतिधत प्रमाणपत्रांच्या प्रतीसह व शुल्कासह संबधित जिल्हयाच्या घटक विद्यालयांत विहीत शुल्क भरुन सादर करावे.

८.३ खुल्या उमेदवारांसाठी रु. ४००/- तर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.२००/- प्रवेश अर्ज शुल्क आहे. सदरचे शुल्क नियंत्रक (Comptorlle, MPKV, Rahuri), मफुकृवि, राहुरी यांचे खातेक्रमांक ३९३१९१३४८५५ IFSC code SBIN०००३२३९ या खात्यावर जमा करुन त्याची युटीआरक्रमांकासहची पावती किंवा नियंत्रण, मफुकृवि, राहुरी (Comptorlle, MPKV, Rahuri) यांचे नांवे धनाकर्ष (डीडी) अर्जासोबत जोडून **प्राचार्य, ज्या त्या जिल्हयातील शासकीय कृषि तंत्र विद्यालय यांचे कार्यालयात भरावे.** सदरचे शुल्क ना परतावा आहे.

८.४ कृषि तंत्र पदविका / कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात प्रवेश घेणा-या उमेदवारांचे वय दिनांक ३०.०९.२०२१ रोजी १४ ते ३० वर्षाचे दरम्यान असले पाहिजे व उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांचे वय ४५ पेक्षा जास्त नसावे.

**टिप : आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना नॉनक्रिमिलिअर दाखल्याअभावी जर खुल्या प्रवर्गात प्रवेश निश्चित झाल्यास त्यांना रुपये २००/-अतिरीक्त प्रवेश अर्ज शुल्क भरावे लागेल.**

**उमेदवाराने अर्जासोबत खाली दर्शविलेल्या कागदपत्रांच्या छायांकीत साक्षांकीत केलेल्या प्रती अर्जासोबत जोडाव्यात.**

८.५ इयत्ता १० वी अभ्यासक्रमाचे गुणपत्रक (प्रमाणपत्र)

८.६ **विद्यालयाचा / शाळा सोडल्याचा दाखला :** ज्या विद्यालयातून शेवटची परीक्षा उत्तीर्ण आहे त्या विद्यालयाचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा उमेदवाराने इतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला असेल तर त्या विद्यालयाचे /महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट (Bonafide Certificate) परंतु

एकदा प्रवेश घेतल्यानंतर उमेदवाराने ७ दिवसांच्या आत शाळा सोडल्याचा दाखला जेथे प्रवेश घेतला असेल तेथे सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा त्याचा प्रवेश रदद होऊ शकतो. तसेच, ज्या उमेदवाराचा इयत्ता १० वी, ११ वी, १२ वी नंतर प्रवेश काही कारणाने शैक्षणिक खंड पडला असेल तर त्या उमेदवारांनी त्यासंबधीचे तहसिलदार यांच्या समोर रु. १००/- स्टॅप पेपरवर केलेले प्रतिज्ञापत्रक (Gap Certificate)सादर करावे.

८.७ **विद्यार्थ्यांना १२ टक्के गुणांचा अधिभार मिळण्यास पात्र प्रमाणपत्र :**

८.७.१ **तलाठी / पटवारी यांनी सन २०१९-२० किंवा २०२०-२१ मध्ये दिलेला शेतजमीनीचा ७/१२ चा उतारा/खसरा (गांव नमूना)** उमेदवाराच्या नांवावर किंवा आई /वडील किंवा आजी /आजोबा यांचे नांवे असावा.

८.७.२ यदाकदाचित आई /वडील हयात नसतील तर सदर उतारा त्यांच्या कुटुंबप्रमुखाच्या नांवावर असावा व या परिस्थितीत कुटुंब प्रमुखाचे **रु. १००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र असावे. प्रतिज्ञापत्रकामध्ये सदर उमेदवाराचा उक्त जमीनीमध्ये कायदेशीर हक्क असल्याचे नमूद करण्यात यावे.**

८.७.३ सदर उतारा मराठी/हिंदी/इंग्रजी भाषेत नसेल तर **संबधित राज्यातील राजपत्रित अधिका-याने प्रमाणित केलेले उता-याचे अचूक भाषांतर.**

८.७.४ उमेदवाराच्या आईचा तिच्या वडीलांकडील/चुलते/मामा शेत जमीनीत वाटा असल्याबाबतचे रु. १००/- च्या मुद्रांकावर तिच्या वडीलांचे प्रतिज्ञापत्र व ७/१२ उतारा अर्जासोबत जोडल्यास असा उमेदवार १२ गुणांचा अधिभार मिळण्यास पात्र राहील.

८.७.५ उमेदवारांस सूचित करण्यात येते की, ७/१२ उता-याच्या आवश्यक तेवढया सत्यप्रती प्रवेशाच्या वेळेस सोबत ठेवाव्यात.

८.७.६ उमेदवाराच्या जमीनीच्या ७/१२ उता-यामध्ये नोंदविलेल्या नावापेक्षा त्याच्या / तिच्या इयत्ता १० वी / १२ वी च्या गुणपत्रक व प्रमाणपत्रामध्ये असलेले नांव भिन्न असल्यास अशा उमेदवाराने त्याबाबचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

किंवा

**भूमिहिन शेतमजूर असल्याबाबचे प्रमाणपत्र :** उमेदवाराचे वडील / पालक भूमिहिन शेतमजूर असल्यास भूमिहिन शेतमजूराचे शेतमजूरी करणे हे उपजिविकेचे साधन असल्याचा उल्लेख प्रमाणपत्रात असणे गरजेचे आहे. हे प्रमाणपत्र तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांचे सही शिक्क्यानिशी असावे. सदर प्रमाणपत्र धारक उमेदवार शेतकरी या प्रवर्गासाठी (AG Category)

ठेवण्यात आलेल्या आरक्षणासाठी पात्र ठरणार नाही. सदर प्रमाणपत्राचा नमूना प्रवेश अर्जासोबत परीशिष्ट- २ येथे देण्यात आलेला आहे.

८.७.७ **शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र :** सन २०१९-२० किंवा २०२०-२१ या वर्षातील तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांनी दिलेले शेतकरी असल्याबाबचे प्रमाणपत्र , या प्रमाणपत्रात उमेदवार त्याचे आई/वडील अथवा आजी / आजोबा (वडीलांचे आई - वडील) हे जमीनधारक किंवा कूळ असून त्या जमीनीव्दारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजिवीकेचे प्रमुख साधन आहे. असे नमूद केलेले असावे. सदर प्रमाणपत्राचा नमूना प्रवेश अर्जासोबत परिशिष्ट - १ येथे देण्यात आलेला आहे. अशा प्रमाणपत्र धारकांस शेतकरी प्रवर्ग लागू असेल.

८.८ **जातीचे प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र** उपजिल्हाधिकारी/उपविभागीय/तहसीलदार/तालुका दंडाधिकारी यांनी विहीत नमुन्यामध्ये दिलेले जातीचे प्रमाणपत्र, विमुक्त जाती- अ, भटक्या जमाती - ब, भटक्या जमाती - क, इतर मागासवर्गीय व विशेष प्रवर्गातील उमेदवारांनी तहसीलदार, तालुका दंडाधिकारी अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या सक्षम अधिका-यांनी दिनांक ०१.०४.२०२१ रोजी किंवा त्यानंतर दिलेले किंवा अर्ज ज्या दिनांकास दिला असेल त्या दिनांकास ग्राहय असलेले उत्पन्न व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र.

८.९. **प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचा दाखला :** महाराष्ट्रातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी (District Rehabilitation/Resettlement Officer) यांनी उमेदवार / वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याचे / तिचे वडिलांची /पालकांची किंवा आजोबांची शेतजमीन महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठे /पाटबंधारे /वीज /संरक्षण/महामार्ग प्रकल्प या विभागासाठी संपादित केलेली /झालेली आहे असे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सक्षम (जिल्हा पुनर्वसन अधिकारी) अधिका-याने दिलेल्या प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर **या सवलतीचा फायदा ज्यांना द्यावयाचा आहे, त्याच्या नांवाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.**

८.१०. **राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.)प्रमाणपत्र :** हवाईदल /नौदल /स्थल सेना विभागाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा स्काऊट गाईड तालुका समादेशक /मुख्याध्यापक /प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र छात्र सेना (एम.सी.सी.) जिल्हा समादेशक अधिकारी /मुख्याध्यापक /प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र. (सदरचे प्रमाणपत्र इ.८ वी ते १० वी या कालावधीतील असावे.)

८.११. **क्रिडा प्रमाणपत्र :** तालुका / जिल्हा क्रिडा अधिका-याने निर्गमित केलेले इयत्ता ८ वी ते १० वी या कालावधीतील प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल. केवळ मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र

ग्राहय धरण्यात येणार नाही. नोंदनीकृत क्रिडा असोशियनने प्राधिकृत केलेल्या क्रिडा स्पर्धेच्या प्रमाणपत्रावर तालुका / जिल्हा क्रिडा अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी असल्यास अधिभार मिळेल.

८.१२. **तालुका / जिल्हा स्तरावर सांस्कृतीक नैपुण्य/वादविवाद**:नाटक इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतला असल्यास इयत्ता ८ वी ते १० वी या कालावधीतील यासंबधी शिक्षणाधिका-याचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

८.१३. स्वातंत्र्यसैनिकांसाठी असलेल्या आरक्षण सवलतीचा लाभ स्वातंत्र्यसैनिकांचे मुलगा / मुलगी किंवा मुलाची /मुलीची, मुलगा /मुलगी यांना खालील अटींच्या अधीन राहून दिला जाईल. उमेदवाराचे आई /वडील किंवा आजी /आजोबा स्वातंत्र्यसैनिक असल्याबाबतचे मा. मुख्यमंत्र्यांचे सहीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यसैनिक यांचे खालील मुद्यांवरील रुपये १००/- चे स्टॅम्पपेपरवरील प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

- उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलाचा /मुलीचा, मुलगा /मुलगी आहे.
- स्वातंत्र्यसैनिक ह्या सवलतीचा उपयोग यापूर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.
- स्वातंत्र्यसैनिक ह्या सवलतीचा उपयोग कुठल्याही नातेवाईकासाठी, जर आता उपयोग केला तर पुढे करणार नाही.

८.१४. **आजी माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र** : उमेदवाराचे वडील सैनिक असल्यास संबधीत सैन्याधिकारी / जिल्हा सैनिक बोर्डाचे अधिकारी यांचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र किंवा Discharge Certificate. उमेदवार स्वत: सैनिक असल्यास संबधित सैन्याधिकारी / जिल्हा सैनिक बोर्डाचे अधिकारी यांचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र किंवा Discharge Certificate (टिप : उमेदवार माजी सैनिक असल्यास त्याचे वय ४५ पेक्षा जास्त नसावे)

८.१५. **कृषि विद्यापीठे /कृषि परीषदेचे कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र :** उमेदवाराचे आई-वडील कृषि विद्यापीठे /कृषि परिषदेचे आजी /माजी अथवा मृत सेवक असल्यास संबंधीत कार्यालय प्रमुख किंवा नियंत्रण अधिका-याचे प्रमाणपत्र जोडावे.

८.१६. **अपंग असल्याचे प्रमाणपत्र :** अपंग वर्गवारीसाठी उमेदवाराचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे **जिल्हा शल्यचिकित्सक / वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र**. स्वत:ची वैद्यकीय तपासणी केल्याबाबतचा नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-याचा दाखला (प्रवेशानंतर सादर केला तरी चालेल)

८.१७. **अनाथ प्रमाणपत्र** : आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटरहेडवरील उपायुक्त (बालविकास), पुणे /आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र.

८.१८. सादर केलेले कागदपत्रे वाचणीय असावेत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे जोडावीत. सादर केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राहय धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पुर्णतः उमेदवारीची असेल.

**खालील पैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे प्रवेश अर्जाचा विचार न करता तो आपोआपच रदद समजण्यात येईल.**

८.१९.१ प्रवेश अर्जावर उमेदवारचे पासपोर्ट आकाराचे सद्याचा फोटो व स्वतःची स्वाक्षरी नसल्यास.

८.१९.२ पात्रता परीक्षेचे (इयत्ता १० वी किंवा समकक्ष) गुणपत्राची प्रत अर्जाबरोबर जोडली नसल्यास.

८.१९.३ प्रवेश अर्जासोबत सादर केलेल्या प्रतींच्या सत्यतेबाबत स्वयंघोषणापत्र सादर केलेले नसल्यास.

८.१९.४ शाळा सोडल्याचा दाखला किंवा बोनाफाईड सर्टिफिकेट (Bonafied Certificate) ची प्रत सादर केलेली नसल्यास.

८.१९.५ सेवेत असणा-या उमेदवाराने संबधित नियुक्ती प्राधिका-याचे ना हरकत प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास.

८.१९.६ प्रवेश अर्जाचे विहीत शुल्क न भरल्यास.

८.२० कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाच्या आणि कृषि तंत्रनिकेतन अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेशाच्या वेळी किंवा गुणवत्ता यादी तयार करतांना दोन किंवा त्यापेक्षा उमेदवारांना समसमान गुण असतील तर अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम ठरविण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अनुक्रमे अवलंब करण्यात येईल.

अ) इयत्ता १० वी मधील उच्चतम गुणांची टक्केवारी (कृषि तंत्र पदविका /कृषि तंत्रनिकेतन प्रथम वर्ष प्रवेश ).

ब) कमी प्रयत्नात इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेला उमेदवार

क) वयाने मोठा असलेला उमेदवार

**९. प्रवेश पध्दती :**

महात्मा फुले कृषि विद्यापीठाव्दारे कृषि तंत्र पदविका / तंत्रनिकेतन अभ्यासक्रमासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यासाठी नंतर पात्र अर्जदारांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी व त्या यादी संदर्भात काही तक्रार असल्यास त्याचे निवारण करणेसाठी खालील छाननी आणि तक्रार निवारण समिती खालील प्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य, घटक/अनुदानीत कृषि तंत्र विद्यालय | अध्यक्ष |
| २. | कनिष्ठ संशोधन सहाय्यक/कृषि सहाय्यक, कृषि तंत्र विद्यालय | सदस्य |
| ३. | वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक, कृषि तंत्र विद्यालय | सदस्य |
| ४. | कनिष्ठ संशोधन सहाय्यक (शिक्षण)/कृ. स. कृषि तंत्र विद्यालय | सदस्य सचिव |

९.१ प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी करून सर्व प्रवेश अर्जांची गुणवत्तेनुसार जिल्हानिहाय तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.प्रवेश प्रक्रिया जिल्हयाच्या घटक / अनुदानींत कृषि तंत्र विद्यालयातच केली जाईल. अर्जदारांनी सदरील यादी संबधित जिल्हयाच्या घटक / अनुदानीत कृषि तंत्र विद्यालयात पहावी. प्रवेश निवडी संबधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येणार नाही. विद्यार्थ्यांनी खालील दिलेल्या प्रवेश कार्यक्रमाचे काळजीपूर्वक पालन करावे. प्रवेश कार्यक्रमाप्रमाणे विद्यार्थी उपस्थित न झाल्यास त्याच्या प्रवेशासंबधी होणा-या नुकसाणीची जबाबदारी संबधित विद्यार्थ्यावर राहील.

९.२ अर्जदारास गुणवत्ता यादीतील गुणानुक्रमाबाबत अथवा प्रमाणपत्राबाबत अथवा अधिभाराबाबत काही तक्रार असल्यास त्यांनी आपली तक्रार संबधित घटक / अनुदानीत कृषि तंत्र विद्यालयांत तक्रार अर्जासह विहीत कालावधीत करावी.

९.३ सदरील तक्रारीची शहानिशा तक्रार निवारण समिती प्रवेश अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन करेल व त्या समितीचा निर्णय विचारात घेऊन आवश्यकतेनुसार सर्वसाधारण गुणवत्ता यादीत सुधारणा करण्यात येतील.

९.४ अंतिम गुणवत्ता यादी तयार करुन प्रवेश कार्यक्रम खालील प्रमाणे राबविण्यात येईल.

९.५ कृषि, पशुसंवधन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवस्थापन विभाग शासन निर्णय क्रमांक कृषिवि १२९८/सीआर २३७/२० अे, दिनांक २६ एप्रिल, २००० च्या परिशिष्ट अ मुददा क्रमांक १० अन्वये एकूण प्रवेश क्षमतेच्या १५ टक्के जागा **'व्यवस्थापन कोटा'** म्हणून राखीव कोटा ठेवण्यात येईल व तो प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत असले आणि तो एच्छिक असेल.

कृषि तंत्र पदविका / कृषि निकेतन पदविका कार्यक्रम २०२१-२२

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १. | प्रवेश अर्ज व माहिती पुस्तिका संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याचा दिनांक | २३.०८.२०२१ |
| २. | प्रवेश अर्ज विहीत प्रमाणपत्रे व शुल्कासह संबधित घटक कृषि तंत्र विद्यालयांत सादर करण्याचा अंतिम दिनांक | ९.०९.२०२१ |
| ३. | प्रथम गुणवत्ता यादी संबधित जिल्याच्या घटक कृषि तंत्र विद्यालयात प्रसिध्द करण्याचा दिनांक | १७.०९.२०२१ |
| ४. | तक्रार अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | २२.०९.२०२१ |
| ५. | तक्रार निवारण समिती बैठक | २४.०९.२०२१ |
| ६. | सुधारीत गुणवत्ता यादी संबधित घटक कृषि तंत्र विद्यालयात प्रसिध्द करण्याचा दिनांक | २८.०९.२०२१ |
| ७. | ८० टक्के व त्यापेक्षा अधिक अधिभारासह गुणवत्ताधारक | ०४.१०.२०२१ ते ०५.१०.२०२१ |
| ८. | ७० ते ७९.९९ टक्के पर्यंत अधिभारासह गुणवत्ताधारक | ०६.१०.२०२१ ते ०७.१०.२०२१ |
| ९. | ६० ते ६९.९९ टक्के पर्यंत अधिभारासह गुणवत्ताधारक | ०८.१०.२०२१ ते ०९.१०.२०२१ |
| १०. | ५९.९९ टक्के व त्यापेक्षा कमी अधिभारासह गुणवत्ताधारक | ११.१०.२०२१ ते १२.१०.२०२१ |
| ११. | संवर्ग बदलून रिक्त जागा भरण्याचा दिनांक | १३.१०.२०२१ ते १४.१०.२०२१ |
| १२. | शैक्षणिक कार्यक्रमाची सुरूवात | २०.१०.२०२१ |

***(उपरोक्त कार्यक्रम पत्रिका ही अंतिम नुसुन कोव्हीड -१९ च्या प्रभावामुळे त्यात बदल होउ शकतो त्यामुळ सुधारीत कार्यक्रम पत्रिका वेळोवेळी विद्यापीठ वेबसाईट, कृषि तंत्र विद्यालयांचे सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल)***

**९.५** गुणवत्ता यादी प्रमाणे अर्जदारांना प्रवेश देणे, घटक व मान्यता प्राप्त खाजगी शिक्षण संस्थांना बंधनकारक आहे.

**९.६ .१.** एखाद्या विद्यार्थ्याने घटक किंवा खाजगी कृषि विद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर तो अंतिम असुन त्यात कोणताही बदल करता येणार नाही. तथापि एखादा विद्यार्थी घटक कृषि तंत्र विद्यालयाच्या रिक्त जागेवर खाजगी कृषि तंत्र विद्यालयातून प्रवेशासाठी पात्र ठरला तर त्याने विनाअनुदानीत कृषि तंत्र विद्यालयात प्रवेश घेतांना भरलेले सर्व शुल्क संबधित विद्यार्थ्यांस परत करावे लागेल व त्यास घटक कृषि तंत्र विद्यालयात प्रवेश देण्यात येईल व संबधित खाजगी कृषि तंत्र विद्यालयास त्याची माहिती देण्यात येईल.

९.६.२ सर्वसाधारणपणे कोणत्याही विद्यार्थ्यास एका खाजगी कृषि तंत्र विद्यालयातून दुस-या खाजगी कृषि तंत्र विद्यालयात प्रवेश बदल करता येणार नाही.

९.७ आरक्षित जागेपैकी कुठल्याही एका वर्गाचे प्रवेश अर्ज पुरेसे आले नाहीत व संवर्गाच्या जागा रिक्त राहील्यास त्या जागा उर्वरीत मागासवर्गीयाची सरमिसळ करून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

९.८ एकूण सर्व राखीव जागांचा विचार करुनही जर काही जागा रिक्त राहत असतील तर त्या जागा गुणानुक्रमे संवर्गाचा विचार न करता भरण्यात येतील.

९.९. उमेदवाराची निवड ही तात्पुरत्या स्वरुपाची असेल

९.१० प्रवेशाबाबत विद्यापीठाचा निर्णय अंतिम राहील.

**१० प्रवेश घेण्याबाबतचे नियम व अटी :**

१०.१ प्रवेश कार्यक्रमाप्रमाणे सुधारीत गुणवत्ता यादीतील पात्र झालेल्या उमेदवारांनी त्या जिल्हयाच्या घटक कृषि तंत्र विद्यालयात उपस्थित राहून प्रवेश घ्यावा.

१०.२ उमेदवाराने प्रवेश घेतेवेळी अर्जासोबत दिलेल्या सर्व प्रमाणित कागदपत्रांच्या मूळ प्रती सोबत आणल्या पाहीजेत. मूळ कागदपत्रांशिवाय प्रवेश दिला जाणार नाही व त्याबाबत कुठलिही सवलत अथवा विनंती विचारात घेतली जाणार नाही. प्रवेशाच्यावेळी मूळ प्रमाणपत्रे व शुल्क प्राप्त न झाल्यास निवड रदद समजण्यात येईल व त्याबाबत कुठलिही तक्रार ऐकली जाणार नाही.

१०.३ प्रवेश प्रक्रियेच्या वेळी उमेदवाराने घटक कृषि तंत्र विद्यालयाने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित रहाणे आवश्यक आहे.उशीरा आल्यास विद्यार्थ्यास त्या दिवशींच्या प्रवेश प्रक्रियेत सामावून घेण्यात येणार नाही व या संदर्भात कोणत्याही कारणांचा / सबबीचा विचार केला जाणार नाही. तसेच, त्याबाबत कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही व पत्रव्यवहारही केला जाणार नाही.

तथापि, प्रवेश प्रक्रियेच्या वेळी उमेदवाराने घटक कृषि तंत्र विद्यालयाने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित रहाणे आवश्यक आहे. प्रवेश प्रकियेचा कार्यक्रम माहिती पुस्तिकेत दिलेला आहे. ही प्रक्रिया दोन सत्रात होईल. प्रथम सत्र म्हणजे दररोज सकाळी ९.०० ते १.०० या वेळेत निर्धारीत वेळापत्रकानुसार बोलविण्यात आलेल्या गुणवत्ताधारक उमेदवारांनी प्रवेशासाठी आल्याबाबतचा नोंदणी अर्ज प्राथमिक माहिती भरुन त्वरीत त्याच कार्यालयात द्यावा. व्दितीय सत्रांत म्हणजे दुपारी २.०० वा. सकाळी नोंदणी केलेल्या उमेदवारानीच प्रत्यक्ष प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्रांसह हजर रहावे लागेल. **एखादा उमेदवार नोंदणीच्या नियोजित वेळेत उपस्थित न राहाता उशिरा आल्यास त्यास त्या दिवशी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्याचे प्रवेश पूर्ण झाल्यानंतरच त्यांच्या प्रवेशाचा विचार करण्यात येईल.**

तथापि, अनुपस्थित गुणवत्ताधारक उमेदवार अथवा शुल्का अभावी / मूळ कागदपत्रांच्या अभावी प्रवेश घेऊ न शकलेला उमेदवार प्रवेश प्रक्रियेतील नियोजित तारखेनंतर परंतु, प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीत प्रवेशासाठी विहीत वेळेत नोंदणी अर्ज करुन ज्या दिवशी प्रवेशासाठी आला असेल अशा उमेदवारांना त्या दिवशीच्या उपलब्ध असणा-या जागा मधून गुणवत्तेप्रमाणे प्रवेश देण्याचा विचार करण्यात येईल.

१०.४ कृषि पदविका अभ्यासक्रमास प्रवेश वर्षास प्रवेश घेतल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे घटक कृषि तंत्र विद्यालयात अंतिम गुणवत्ता यादी विद्यापीठास सादर करेपर्यंत राहतील तदनंतर ही कागदपत्रे सर्व संबधित कृषि विद्यालयास अंतिम प्रवेश यादी बरोबर देण्यात येतील. जर संस्थेने या कागदपत्रातील कोणतेही मूळ प्रमाणपत्र सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) यांच्या परवानगीशिवाय विद्यार्थ्यास कोणत्याही कारणास्तव परत केल्यास संस्थेवर कार्यवाही करण्यात येईल.

१०.५ संशयास्पद गुणपत्रिका एस.सी.सी. बोर्डाकडे तपासणीसाठी पाठविल्या जातील व त्याबाबत बोर्डाकडून माहिती आल्यानंतर प्रवेश पूर्ण झाला असे समजण्यात येईल.

१०.६ एस.एस.सी. परीक्षेचे मूळ गुणपत्रक प्रवेश देतेवेळी ग्राहय समजण्यात येईल. एस.सी.सी प्रमाणपत्रावरुन प्रवेश दिला जाणार नाही.

१०.७ टी.सी ऐवजी बोनाफाईड प्रमाणपत्रावर प्रवेश घेतल्यानंतर मूळ टी.सी व इतर सर्व आवश्यक ती कागदपत्रे विहीत मुदतीतच सादर करणे बाबत हमी पत्र द्यावे लागेल.

१०.८ टिसी ऐवजी विद्यार्थ्याने बोनाफाईड प्रमाणपत्रावर प्रवेश घेतला असल्यास त्याने जर सात दिवसात मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास संबधित प्राचार्यांनी अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करुन त्याची नांवे सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) यांना कळवावीत अशा प्रकरणाची सर्व जबाबदारी प्राचार्यांची राहील.

विद्यार्थ्याने प्रवेश घेतांना शाळा सोडल्याचा दाखल्याची मूळ प्रत सादर करणे आवश्यक आहे. व्दितीय प्रतीवर प्रवेश दिला जाणार नाही.

१०.९ विद्यार्थ्यास वैद्यकीय तपासणी करुन तो सुदृढ आहे याबाबत शासन मान्य वैद्यकीय अधिका-यांची प्रमाणपत्र प्रवेश घेतल्यापासून ३० दिवसाच्या आत द्यावे लागेल.

१०.१० विद्यापीठ कर्मचा-याच्या पाल्यास तो सर्व अटी पूर्ण करीत असल्यास त्याला त्याच्या पसंतीनुसार महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कोणत्याही कृषि विद्यालयात प्रवेश घेता येईल.

१०.११ प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे वैयक्तीक माहिती पत्रक शैक्षणिक दिनदर्शिकेतील तारखेपर्यंत सर्व तपशिलासह तीन प्रतीत संस्थेने संबधित घटक कृषि विद्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा विलंबाने सादर करणा-या संस्थेस प्रती दिन रुपये १००/- प्रमाणे विहीत मुदतीपर्यंत दंड आकारण्यात येईल.

१०.१२ प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यास ज्या कृषि विद्यालयात प्रवेश देण्यात येईल, त्याची विहीत प्रवेश पत्रिका (Admission Slip) तीन प्रतीत तयार करुन ती संबधित विद्यार्थी, संबधित संस्था व घटक कृषि विद्यालय यांच्याकडे राहील.

**११. प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्क परतावा :**

- प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश रदद केल्यास विद्यार्थ्याकडून प्रवेश शुल्कापोटी कमाल रु. १०००/- रक्कम कपात करण्यात येईल.
- प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रदद केल्यास वर्ग सुरू झ ालेल्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रदद केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे होणारे वर्ष / सत्र आधारीत शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास ) संबधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.
- वर्ग सुरू झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश फेरीव्दारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी नोंदणी करून प्रवेश रदद केल्यास, नोंदणी केलेल्या तारखेच्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रदद केला असेल त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे वर्ष / सत्र आधारीत शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.

**१२. विद्यार्थ्यांची वर्तणूक व शिस्त :**

विद्यार्थी रॅगिंग, अपहरण, आणि इतर गैरशिस्तीच्या प्रकरणात आढळून आल्यास त्यास पूर्वसूचना न देता विद्यालयातून काढून टाकण्यात येईल. तसेच, रॅगिंगच्या नियमानुसार त्याचेवर कार्यवाही होईल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी helplilne@antiragging.in साईटवर भेट देऊन रॅगिंगबाबतची संपूर्ण माहिती स्वतः अवगत करुन घ्यावी. प्रत्येक विद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याचे व त्याच्या पालकाचे त्याचा प्रवेश निश्चित झाल्यानंतर रॅगिंगबाबतचे प्रतिज्ञापत्र ऑनलाईन पध्दतीचे www.antiragging.in किंवा www.amanmovement.org या संकेतस्थळावर भरुन घेणे सक्तीचे आहे.

**१३. शिष्यवृत्ती आणि सवलती :**

कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम व्यावसायीक म्हणून घोषित झालेले नाहीत. त्यामुळे व्यावसायीक अभ्यासक्रमांना लागू असलेल्या शैक्षणिक सवलती (शैक्षणिक शुल्क परीपूर्ती व शिष्यवृत्ती) सदर अभ्यासक्रमांना अनुज्ञेय नाहीत.

## १४. आरक्षित जागा :

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील तरतुदीनुसार या विद्यापीठातर्गत विद्यालयांमध्ये प्रवेशासाठी खालील प्रमाणे जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | वर्ग | आरक्षित जागांची टक्केवारी |
|---|---|---|
| १. | अनुसुचित जाती व नवबौध्द | १३ |
| २ | अनुसुचित जमाती | ७ |
| ३ | अ) विमुक्त जमाती (अ) (१४ व तत्सम जाती) (व्ही.जे.अे) | ३ |
| | ब) भटक्या जमाती (ब) (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) (एन.टी.ब) | २.५ |
| | क) भटक्या जमाती (क) (धनगर व तत्सम जमाती) (एन.टी.सी) | ३.५ |
| | ड) भटक्या जमाती (ड) ( वंजारी व तत्सम जाती) (एन.टी.डी) | २.० |
| ४ | इतर मागास वर्ग | १९ |
| | एकूण | ५० |
| ५ | शेतक-यांचे मुले (अे.जी) | ६ |
| ६ | स्वातंत्र्य सैनिकांची मुले (एफ.एफ) | २ |
| ७ | महाराष्ट्र शासनाच्या प्रकल्प विस्थापीत पुनर्वसन अधिनियम १९९६ नुसार प्रकल्प विस्थापीत व्यक्ती आणि त्याची मुले (पी.ए.पी) | ४ |
| ८ | आजी व माजी सैनिकांची मुले (डी.पी) | २ |
| ९ | अपंग (४० टक्के किंवा त्या पेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सालयाचे प्रमाणपत्र आवश्यक) (पी.एच) | ५ |
| १० | महिला | ३० |
| ११ | अनाथ | १ |
| १२ | EWS | १० |

**१४.१** अनुक्रमांक ५ ते १० या आरक्षणाचा खुला व आरक्षित संवर्गामध्ये समावेश करण्यात आलेला आहे, तसेच क्र. ११ हे आरक्षण खुल्या प्रवर्गात गुणवत्तेनुसार समाविष्ट राहील.

**१४.२** भारतीय संविधानानुसार मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवा योजना विभाग क्र. टीइएम १०२४/(६३०३)/ताशि-१ दिनांक ३ जून, १९९४ मधील परिच्छेद क्र. ४ मध्ये विहीत केल्याप्रमाणे एकूण ५० टक्के जागा आरक्षित करण्यात येतील.

**१४.३** पदवी, पदव्युत्तर आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रकियेसंदर्भात शासन निर्णय क्र. कृषि व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०.१०.२०११ मध्ये नमूद करण्यात आलेल्या जागांच्या रुपांतराच्या कार्यपध्दतीच्या धर्तीवर पदविका अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांचे रुपांतर करण्यात येईल. सदर शासन निर्णय कृषि विद्यापीठाच्या **www.mpkv.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१४.४** शासन निर्णय क्रमांक सीबीसी १०/२३००६/प्र.क्र.१५/मावक ५, दिनांक ५.६.२००६ अन्वये विमुक्त जाती अ, ब भटक्या जमाती क, ड त्याचबरोबर इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास प्रवर्ग यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या सहिशिक्यानिशी क्रिमिलिअर लागू नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा, सदर उमेदवारास त्या प्रवर्गाचे आरक्षण मिळणार नाही. म्हणजेचे तो उमेदवार खुल्या प्रवर्गाचा धरला जाईल.

१४.५ इतर आरक्षणांतर्गत अ.क्र. ६ येथील महिलांच्या विशेष आरक्षणास त्या त्या प्रवर्गासाठी विहीत करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चीतपणे मिळावा यासाठी सामान्य प्रशासन विभाग परीपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१९८/१६/अ, दिनांक १६.३.१९९९ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

**१५. गुणाधिभार**

| अ.क्र. | बाब | गुण |
|---|---|---|
| १. | तलाठी / पटवारी यांनी सन २०१९-२० किंवा २०२०-२१ मध्ये दिलेला शेतजमीनीचा ७/१२ चा उतारा/खसरा (गाव नमूना) उमेदवाराच्या नांवावर किंवा त्याचे आई / वडील किंवा त्याचे आजी /आजोबा यांच्या नांवे, यदाकदाचित आई वडील हयात नसतील, तर सदर उतारा त्याच्या कुटुंब प्रमुखाच्या नावावर असावा. | १२ टक्के |
| २. | एन.सी.सी/एम.सी.सी/स्काऊट गाईड प्रमाणपत्र असल्यास (तालुका/जिल्हा समादेशक/मुख्याध्यापक यांचे प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल) (इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतचे ) | २ टक्के |
| ३. | क्रिडा / सांस्कृतिक नैपुण्य / वादविवाद / नाटक इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतला असल्यास तालुका जिल्हा स्तरावरील सहभाग (इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतचे ) | २ टक्के |
| ४. | राज्यातील कृषि विद्यापीठाच्या आजी / माजी कर्मचा-यांचा मुलगा / मुलगी असल्यास संबधित विद्यापीठाच्या कुलसचिव,कार्यालय प्रमुख अथवा नियंत्रक अधिकारी यांचे प्रमाणपत्र | ३ टक्के |
| | **एकूण अधिभार** | **१९ टक्के** |

**१६ . अभ्यासक्रमाचे शुल्क**

निवड झालेल्या उमेदवारांना प्रवेश घेतेवेळी संबधित शासकीय / अनुदानीत अथवा विनाअनुदानीत विद्यालयांमध्ये शुल्क भरावे लागेल. अभ्यासक्रमाकरीता निर्धारीत केलेल्या शुल्काचा तपशिल खालील प्रमाणे असून ते कृषि परीषदेच्या संमतीने बदलाधीन आहे.

**१६.१ कृषि तंत्र पदविका (२ वर्ष - मराठी माध्यम)**

| अ.नं. | सर्वसाधारण शुल्क | शासकीय / अनुदानित | | विना अनुदानित | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष (रुपये) | द्वितीय वर्ष (रुपये) | प्रथम वर्ष (रुपये) | द्वितीय वर्ष (रुपये) |
| | (अ) शुल्क | | | | |
| १ | शिक्षण शुल्क | १५००० | १५००० | २५००० | २५००० |
| २ | प्रवेश शुल्क | २०० | २०० | २०० | २०० |
| ३ | नोंदणी शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ४ | वाचनालय शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ५ | अंतर्गत परीक्षा शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ६ | जिमखाना शुल्क | १५० | १५० | १५० | १५० |
| ७ | परीक्षा शुल्क (प्रती विद्यार्थी) | ९०० | ९०० | ९०० | ९०० |
| ८ | अनामत शुल्क (परत होणारे) | १००** | -- | १००** | -- |
| ९ | गुणपत्रक शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| १० | प्रमाणपत्र शुल्क | -- | १०० | -- | १०० |
| ११ | ओळखपत्र शुल्क | ३० | -- | ३० | -- |
| १२ | विद्यापीठ वैद्यकीय शुल्क | ५० | ५० | ५० | ५० |
| १३ | विद्यार्थी सुरक्षा विमा हप्ता | १०० | १०० | १०० | १०० |
| | एकूण (अ) | १६९३० | १६९०० | २६९३० | २६९०० |
| | (ब) वसतीगृहात राहू इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी फक्त | | | | |
| १ | वसतीगृह शुल्क | १०००* | १०००* | १०००* | १०००* |
| २ | भांडी शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ३ | मेस (खानावळ) डिपॉझीट (परत होणारे) | १०००** | -- | १०००** | -- |
| ४ | विद्युत बील आकार | १०००* | १०००* | १०००* | १०००* |
| | एकूण (ब) | ३१०० | २१०० | ३१०० | २१०० |
| | एकूण (अ) + (ब) | २०,०३० | १९,००० | ३०,०३० | २९,००० |

* सेवा उपलब्ध असल्यास

**विद्यार्थ्यांना परत करावयाची रक्कम

## १६.२ विनाअनुदानीत कृषि तंत्र निकेतन (३ वर्ष - सहा सत्र - पूर्ण इंग्रजी माध्यम)

| अ.नं. | सर्वसाधारण शुल्क | विनाअनुदानित | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पहिले सत्र (रुपये) | दुसरे सत्र (रुपये) | तिसरे सत्र (रुपये) | चौथे सत्र (रुपये) | पाचवे सत्र (रुपये) | सहावे सत्र (रुपये) |
| | (अ) शुल्क | | | | | | |
| १ | शिक्षण शुल्क | १५००० | १५००० | १५००० | १५००० | १५००० | १५००० |
| २ | प्रवेश शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| ३ | नोंदणी शुल्क | २०० | २०० | २०० | २०० | २०० | २०० |
| ४ | वाचनालय शुल्क | ३०० | ३०० | ३०० | ३०० | ३०० | ३०० |
| ५ | परीक्षा शुल्क (प्रती विद्यार्थी) | ८०० | ८०० | ८०० | ८०० | ८०० | ८०० |
| ६ | गुणपत्रक (ग्रेड कार्ड) शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| ७ | पदविका प्रमाणपत्र शुल्क | ००० | ००० | ००० | ००० | ००० | ५०० |
| ८ | विद्यार्थी सहाय्यक कल्याण निधी | १५० | ००० | १५० | ००० | १५० | ००० |
| ९ | जिमखाना शुल्क | ३५० | ३५० | ३५० | ३५० | ३५० | ३५० |
| १० | युवक महोत्सव शुल्क | १०० | ००० | १०० | ००० | १०० | ००० |
| ११ | निकेतन मासीक (मॅगेझीन) शुल्क | १५० | ००० | १५० | ००० | १५० | ०५० |
| १२ | क्रिडा स्पर्धा | १० | ०० | १० | ०० | १० | ००० |
| १३ | आपत्ती व्यवस्थापन शुल्क | १० | ०० | १० | ०० | १० | ००० |
| १४ | ओळखपत्र शुल्क | ११० | ००० | ००० | ००० | ००० | ००० |
| १५ | वैद्यकीय शुल्क | १०० | ००० | १०० | ००० | १०० | ००० |
| १६ | विद्यार्थी सुरक्षा विमा हप्ता | १५० | ००० | १५० | ००० | १५० | ००० |
| १७ | अनामत शुल्क ** | १००० | ०००० | ००० | ०००० | ००० | ००० |
| १८ | को- ऑपरेटीव्ह सोसायटी * | १०० | ००० | १०० | ००० | १०० | ००० |
| १९ | वार्षिक पारीतोषिक वितरण समारंभ | १०० | ००० | १०० | ००० | १०० | ००० |
| २० | इलिजिबिलिटी शुल्क | ३०० | ००० | ३०० | ००० | ३०० | ००० |
| | एकूण (अ) | **१९११०** | **१६८५०** | **१८०२०** | **१६८५०** | **१८०२०** | **१७३५०** |
| | (ब) वसतीगृहात राहू इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी फक्त | | | | | | |
| १ | वसतीगृह अनामत शुल्क ** | २००० | ०००० | ०००० | ०००० | ०००० | ०००० |
| २ | वसतीगृह शुल्क * | २५०० | २५०० | २५०० | २५०० | २५०० | २५०० |
| ३ | विद्युत बिल आकार | २५०० | २५०० | २५०० | २५०० | २५०० | २५०० |
| ४ | मेस (खानावळ) डिपॉझीट ** | २००० | ०००० | ०००० | ०००० | ०००० | ०००० |
| | एकूण (ब) | **९०००** | **५०००** | **५०००** | **५०००** | **५०००** | **५०००** |
| | एकूण (अ) + (ब) | **२८११०** | **२१८५०** | **२३०२०** | **२१८५०** | **२३०२०** | **२२३५०** |

| | | |
|---|---|---|
| * सेवा उपलब्ध असल्यास<br>**विद्यार्थ्यांना परत करावयाची रक्कम | | |

- वसतीगृह शुल्क, मेस डिपॉझिट, विद्युत आकार हे प्रवेशाच्या वेळी घेण्यात येऊ नयेत. प्रवेश नियमित झाल्यानंतर उपरोक्त सेवा उपलब्ध असल्यास या बाबतचे शुल्क आकारण्यात यावे.सेवा उपलब्ध नसल्यास शुल्क आकारु नये.
- अनामत शुल्क, मेस डिपॉझिट इ. रक्कमा शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर लगेच विद्यार्थ्यांना परत करण्यात याव्यात.
- विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास संबधित विषयाकरीता संपूर्ण वार्षिक परीक्षा शुल्क न आकारता संबधित विषयापुरतेच परीक्षा शुल्क आकारण्यात येईल.
- पदविका अभ्यासक्रम अथवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यास त्याचा व्यक्तीगत हिशोब तपासून प्रवेशाच्या वेळी त्याने भरलेली अनामत (Caution money) रक्कम विद्यार्थ्यांना गुणपत्रक देते वेळी परत केली जाईल.

१७. प्रवेशाकरीता तपासवयाच्या कागदपत्रांची सुची (check List)

| अ.क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशिल | आहे() नाही (x) |
|---|---|---|
| १. | सक्षम प्राधिका-याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाणचा उल्लेख असलेले महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याकडील जन्म दाखला / जिल्हा निश्चितीकरीता रहिवाशी प्रमाणपत्र | |
| २. | माध्यमिक / उच्च माध्यमिक शालांन्त (इयत्ता १० वी / १२ वी / कृषि तंत्र पदविका) गुणपत्रक व प्रमाणपत्र | |
| ३. | ज्या विद्यालयातून शेवटची परीक्षा उत्तीर्ण आहे, त्या विद्यालयाचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा उमेदवाराने इतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला असेल तर त्या विद्यालयाचे / महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट (Bonafide Certificate) | |
| ४. | राज्यातील पदनिर्देशीत सक्षम प्राधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र | |
| ५. | तहसिलदार, तालुका दंडाधिकारी अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या सक्षम अधिका-यांनी दिनांक ०१.०४.२०१९ रोजी किंवा त्यानंतर दिलेले किंवा ज्या दिनांकास प्रवेश अर्ज दिला असेल त्या दिनांकास ग्राहय असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलीअर) प्रमाणपत्र | |
| ६. | उमेदवाराचे आई / वडील अथवा आजी / आजोबा स्वातंत्र्यसैनिक असल्याबाबतचे मा. पंतप्रधान / मा. मुख्यमंत्री यांची सही असलेले प्रमाणपत्र | |
| ७. | स्वातंत्र्य सैनिक यांचे खालील प्रमाणे रुपये १००/- चे स्टँपपेपरवरील प्रतिज्ञापत्र<br>उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलाचा / मुलीचा ,मुलगा/मुलगी आहे.<br>स्वातंत्र्यसैनिकाने हया सवलतीचा उपयोग यापूर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.<br>स्वातंत्र्य सैनिकाने हया सवलतीचा आता उपयोग केला तर पुढे करणार नाही. | |
| ८. | उमेदवाराचे वडील अथवा उमेदवार स्वतः सैनिक असल्यास संबधित सैन्याधिकारी / जिल्हाबोर्डाचे अधिकारी यांचे विहीत नमूनयातील प्रमाणपत्र किंवा Discharge Certificate ची प्रत | |
| ९. | दिव्यांग प्रवर्गासाठी उमेदवाराचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक / वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र | |
| १० | महाराष्ट्रातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी उमेदवार / वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याचे / तिचे वडीलांची /पालकांची किंवा आजोबांची शेतजमीन महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठे / पाटबंधारे / वीज/ संरक्षण प्रकल्प या विभागासाठी संपादीत केलेली / झालेली आहे, असे प्रमाणपत्र सक्षम अधिका-याने दिलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्यांना घ्यायचा आहे त्यांच्या नांवाचा उल्लेख असणे आवश्यक आहे. | |
| ११. | उमेदवार किंवा त्याचे माता / पिता किंवा आजी / आजोबा (पित्याकडून) शेतजमीनीचे मालक किंवा कूळ म्हणून शेतजमीन धारक आहे/आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन जमिनीच्या वैयक्तीक मशागतीतून आहे हे दर्शविणारे तहसिलदार / नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या अधिका-याचे विहीत नमुन्यातील / तहसिलदार किंवा नायब तहसिलदार यांनी दिलेल्या त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या विहीत नमून्यामध्ये सन २०१७-१८ किंवा २०१८-१९ या वर्षातील **शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (ऐजी)** | |
| १२. | (i) उमेदवाराचे नांवे किंवा माता / पिता / आजोबा - आजीच्या नांवे शेतजमीन आहे, हे दर्शविणारा तलाठी / पटवारी याने दिलेला **सन २०१७-१८ किंवा २०१८-१९ या वर्षाचा गांव ७/१२ उतारा** | |

| | | |
|---|---|---|
| | (ii) आई / वडील हयात नसल्यास त्याच्या कुटुंब प्रमुखाच्या नावावरील ७/१२ उतारा व कुटुंब प्रमुखाचे **रु. १००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र.**<br>(iii) उमेदवाराच्या आईच्या वडीलोपार्जित शेतजमीनीमध्ये तिचा **हिस्सा असेल तर आईच्या पित्याचे रु. १००/- च्या मुद्रांकावर केलेले प्रतिज्ञापत्र.** | |
| १३. | उमेदवाराच्या माता / पित्याचे उपजिवीकेचे मुख्य साधन शेतजमीनीवरील शारीरिक श्रमाचे आहे, असा उल्लेख असणारे तहसिलदार / नायब तहसिलदाराचे **भूमिहिन शेतमजुराचे प्रमाणपत्र** (असे प्रमाणपत्र अर्जदाराचे नांव नसावे) तथापि, **अशा उमेदवारास शेतकरी (एजी) प्रवर्ग लागू असणार नाही.** | |
| १४. | राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी) प्रमाणपत्र, हवाईदल/नौदल/स्थलसेना विभागाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा स्काऊट गाईड तालुका समादेशक /मुख्याध्यापक/ प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र छात्र सेना (एन.सी.सी) जिल्हा समादेशक अधिकारी / मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र | |
| १५. | तालुका किंवा जिल्हा पातळीवर तालुका / जिल्हा क्रीडा अधिका-याने निर्गमित केलेले इयत्ता १० वी पर्यंतचे प्रमाणपत्र, नोंदणीकृत क्रीडा असोसीएशनचे प्राधिकृत केलेल्या क्रीडास्पर्धेचे तालुका / जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र | |
| १६. | राज्यातील उमेदवाराचे पालक कृषि विद्यापीठे / कृषि परीषदेचे आजी / माजी अथवा मृत सेवक असल्यास संबधित कार्यालय प्रमुख किंवा नियंत्रण अधिका-याचे प्रमाणपत्र | |
| १७. | सांस्कृतिक नैपुण्य / वादविवाद/नाटक इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतला असल्यास तालुका / जिल्हा स्तरावरील सहभाग (इयत्ता ८ वी ते १० पर्यंतचे) प्रमाणपत्र | |
| १८. | सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबधित कार्यालय प्रमुखाचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate). | |
| १९. | महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.अमुजा२०११/प्र.क२१२/का- ३, दिनांक २.४.२०१८ अन्वये आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटर हेडवरील उपायुक्त (बालविकास), पुणे / आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे अनाथ प्रमाणपत्र | |

**(प्रमोद लहाळे)**
**कुलसचिव,**
**मफुकृवि, राहुरी**